



Anusandhanvallari
Vol 2024, No.1
December 2024
ISSN 2229-3388

# गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीचा गरीब व आदिवासी कुटुंबांच्या जिवनमानावर परिणाम-एक अभ्यास.

**[1]प्रा. महादेव रामभाऊ सदावर्ते , [2]मार्गदर्शक-डॉ.आर.बी. मेश्राम**

[1]केवळरामजी हरडे महाविद्यालय, चामोर्शी जि.गडचिरोली .

[2]एन. एच. कॉलेज,ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर .

**गोषवारा (Abstract):** सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) ही भारतातील अन्नसुरक्षेची कणा मानली जाते. गरीब, वंचित आणि दुर्गम भागातील लोकसंख्येला परवडणाऱ्या दरात अन्नधान्य उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या यंत्रणेच्या माध्यमातून केले जाते. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीची रचना, कार्यप्रणाली, अंमलबजावणीतील अडचणी तसेच लाभार्थ्यांवर होणाऱ्या प्रत्यक्ष परिणामांचे चिकित्सक विश्लेषण करण्यात आले आहे. अध्ययनातून PDS यंत्रणेचा गरीब कुटुंबांच्या अन्नसुरक्षेसाठी सकारात्मक आणि आवश्यक असा प्रभाव स्पष्ट झाला. तरीही वितरणातील पारदर्शकता, तांत्रिक साधनांचा (e-PoS मशीन) प्रभावी वापर, लाभार्थ्यांची जागरूकता वाढविणे आणि फेरप्रक्रिया दुकानदारांच्या जबाबदाऱ्यांचे काटेकोर पालन या बाबींमध्ये सुधारणा होण्याची गरज असल्याचे आढळते. निष्कर्षतः, गडचिरोलीसारख्या आदिवासी व नैसर्गिक अडथळ्यांनी भरलेल्या जिल्ह्यात PDS ही केवळ अन्नधान्यवितरणाची प्रणाली नसून सामाजिक व आर्थिक सुरक्षेचा आधारस्तंभ आहे. यंत्रणेतील दुर्बल बाजू दूर करून तंत्रज्ञानविषयक नवकल्पना अंगीकारल्यास ही प्रणाली अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि लाभार्थ्याभिमुख होऊ शकते.

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीचा गरीब व आदिवासी कुटुंबांच्या जिवनमानावर परिणाम-एक अभ्यास करण्यात आला आहे.

**शब्दसंकेत (Keywords):** सार्वजनिक वितरण प्रणाली, अन्नसुरक्षा, स्वस्त धान्य दुकान, रेशनकार्ड, वितरण व्यवस्थापन, पारदर्शकता.

## प्रस्तावना

भारतासारख्या विकसनशील आणि विविधतेने नटलेल्या देशात सामाजिक सुरक्षा योजनांना विशेष महत्त्व आहे. समाजातील सर्व घटकांना पुरेशा प्रमाणात अन्नधान्य उपलब्ध करणे, कुपोषण रोखणे, गरिबी कमी करणे आणि जीवनमान उंचावणे ही कोणत्याही कल्याणकारी राज्याची प्राथमिक जबाबदारी मानली जाते. त्या अनुषंगाने सार्वजनिक वितरण प्रणाली (Public Distribution System – PDS) ही भारताच्या अन्नसुरक्षा व्यवस्थेचा कणा मानली जाते. गरीब आणि वंचित घटकांना नियंत्रित दराने धान्य उपलब्ध करून देणे, आर्थिक विषमता कमी करणे आणि 'अन्न हा मूलभूत हक्क' या संकल्पनेला बळकट करणे हे PDS चे प्रमुख उद्दिष्ट आहे. गेल्या अनेक दशकांत PDS ने ग्रामीण व शहरी भागांत लोकजीवनावर लक्षणीय प्रभाव टाकला असून, विशेषतः मागास व आदिवासी बहुल क्षेत्रांत ही व्यवस्था अधिकच महत्त्वाची ठरते.

गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्रातील अतिदुर्गम, जंगलांनी व्यापलेला व प्रामुख्याने आदिवासी लोकसंख्येचा प्रदेश आहे. सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या दुरावलेल्या आणि नैसर्गिक संसाधनांनी समृद्ध अशा या जिल्ह्याला विकासाच्या प्रवाहाशी जोडून घेण्यासाठी शासन विविध कल्याणकारी योजना राबवत असते. अशा परिस्थितीत सार्वजनिक वितरण प्रणाली ही येथे एक जीवनरेखा म्हणून काम करते. जिल्ह्यातील मोठा भाग वनक्षेत्राने व्यापलेला आहे .तसेच परिवहन, पायाभूत सुविधा, संवाद साधने, रोजगाराची उपलब्धता, शेतीची मर्यादित क्षेत्रफळे अशा अनेक कारनामुळे स्थानिकांना स्वस्त धान्य दुकानांच्या (FPS) माध्यमातून मिळणारे धान्य, तांदूळ, गहू, साखर इत्यादी आवश्यक वस्तू अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात.

त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीची कार्यपद्धती, वितरण व्यवस्था, पारदर्शकता, लाभार्थी समाधान आणि व्यवस्थेचे एकूण प्रभाव यांचा अभ्यास करणे हे आजच्या सामाजिक-आर्थिक संदर्भात अत्यंत आवश्यक ठरते.

गेल्या काही वर्षांत राज्य आणि केंद्र शासनाने PDS अधिक प्रभावी करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे अनेक सुधारणांची अंमलबजावणी केली आहे. राशनकार्डांचे डिजिटायझेशन, ई-पीओएस मशीनची स्थापना, आधार सीडिंग, डोअर-स्टेप डिलिव्हरी, ONORC (One Nation One Ration Card) सारख्या उपक्रमांमुळे वितरण अधिक पारदर्शक व कार्यक्षम बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि, गडचिरोली सारख्या दुर्गम जिल्ह्यात अजूनही अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे दिसून येते. वाहतूक व्यवस्था, सुरक्षा परिस्थिती, पुरवठा साखळीतील अडथळे, लाभार्थ्यांचे अल्पशिक्षण, जागरूकतेचा अभाव, लाभार्थ्यांची भौगोलिक विखुरलेली वस्ती, काही ठिकाणी भ्रष्टाचार, तांत्रिक अडचणी इत्यादी कारणांमुळे PDS ची कार्यक्षमता अपेक्षित पातळीवर पोहोचत नाही. परिणामी, स्वस्त धान्य दुकानांच्या कामकाजात अनेक विसंगती निर्माण होतात, ज्याचा थेट परिणाम लाभार्थ्यांच्या अन्नसुरक्षेवर आणि जीवनमानावर होतो.

गडचिरोली जिल्ह्यातील PDS चा प्रभाव फक्त आर्थिक स्तरापुरता मर्यादित नाही तर सामाजिक स्तरावरही त्याचे महत्त्व अधोरेखित होते. येथे मोठ्या प्रमाणात आदिवासी समुदाय वास्तव्यास असल्यामुळे PDS वितरणातील नियमितता ही अन्न मिळविण्याची खात्री निर्माण करते. अनेक कुटुंबांचे मासिक घरगुती नियोजन PDS वर आधारित असते. विशेषतः कडाक्याच्या उन्हाळ्यात किंवा पावसाळ्यात रोजगाराचे साधन मर्यादित असल्याने स्वस्त धान्य दुकाने गरिबी कमी करण्यास व पोषण सुधारण्यास सहाय्यभूत ठरतात. अशा प्रदेशात PDS चे योग्य व्यवस्थापन लोकांच्या जीवनमानात थेट सुधारणा घडवून आणू शकते, तर गैरव्यवस्था किंवा त्रुटी लोकांना प्रतिकूल परिस्थितीकडे ढकलू शकतात.

### संशोधनाची उद्दिष्टे

1. गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीचे कार्यपद्धती, व्यवस्थापन व वितरण प्रक्रिया यांचे विश्लेषण करणे.
2. सार्वजनिक वितरण प्रणालीचा जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक जीवनमानावर झालेला प्रभाव मोजणे.

### सार्वजनिक वितरण प्रणालीचा विकास

अन्नधान्य व सार्वजनिक वितरण प्रणाली यांचा घनिष्ट संबंध आहे. भारतात सार्वजनिक प्रणालीची सुरुवात दुसऱ्या महायुध्दाच्या काळात ब्रिटिशांनी केली. सार्वजनिक वितरण प्रणालीच्या मार्फत देशातील जनतेला उच्च अन्न सुरक्षेचा स्तर उपलब्ध करुन देणे ही महत्वाची भूमिका पार पाडली जाते. भारतात सर्वात प्रथम सार्वजनिक वितरण प्रणालीची सुरुवात सन 1943 मध्ये देशातील मोठ्या एकूण 13 शहरांमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीची सुरुवात करण्यात आली. तर सन 1946 मध्ये इतर 779 शहरे सार्वजनिक प्रणालीच्या अंतर्गत आणले गेले. सन 1947 मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशात अनेक आर्थिक व सामाजिक समस्या निर्माण झालेल्या होत्या, त्यातच देशात वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे अन्नधान्याची टंचाई मोठ्या प्रमाणात निर्माण झाली होती. अन्नधान्याच्या टंचाईमुळे देशातील अन्नधान्याच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. तेव्हा देशातील जनतेला सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर अन्नधान्य उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला गेला.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचा आर्थिक नियोजन पध्दतीने होण्यासाठी नियोजनाचा स्विकार करण्यात आला. त्यासाठी 15 मार्च 1950 मध्ये नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. सन 1951 मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून नियोजनबध्द आर्थिक विकासाला सुरुवात झाली. नियोजनाच्या काळात देशातील सामाजिक धोरणाचा एक भाग म्हणून सार्वजनिक वित्तरण प्रणाली तशीच चालू ठेवली गेली. पहिल्या पंचवार्षिक योजनेपर्यंत सार्वजनिक वितरण प्रणाली फक्त शहरी भागापुरतीच मर्यादीत होती. देशातील ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या राहत होती. देशातील या लोकसंख्येसमोर तीव्र अन्नधान्य टंचाईचा प्रश्न निर्माण झालेला होता. ग्रामीण भागातील अन्नधान्य टंचाई दूर करुन ग्रामीण भागातील लोकांना अन्नधान्याची सुरक्षितता उपलब्ध करुन देण्यासाठी सार्वजनिक वितरण प्रणालीचा विस्तार ग्रामीण भागातही करण्यात आला. याच काळात सार्वजनिक वितरण प्रणालीचे दोन भाग करण्यात आले. पहिला विभाग म्हणजे

वैधानिक शिधावाटप विभाग होय. वैधानिक शिधा वाटप विभागात कायदेशीरपणे स्वस्त धान्य दुकानामार्फत अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यात आले. दुसरा विभाग म्हणजे गैरवैधानिक या भागात स्वस्त धान्य दुकाने खुल्या बाजारातील अन्नधान्य उपलब्धतेला पुरक म्हणून अन्नधान्य उपलब्ध करुन देत होते. ग्रामीण भागात प्रभावीपणे सार्वजनिक वितरण प्रणालीची कार्यवाही होण्यासाठी सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमांतून देशातील जनतेला मोठ्या प्रमाणावर अन्नधान्य स्वस्त किंमतीमध्ये पुरविण्यात आले. सन 1953 मध्ये 54 दशलक्ष टन अन्नधान्य सार्वजनिक वितरण प्रणालीतून उपलब्ध करुन देण्यात आले. त्यानंतर त्यात वाढ होऊन सन 1956 मध्ये हे प्रमाण 63.3 दशलक्ष टन झाले. अशा परिस्थितीत भारत सरकारने अन्नधान्य वितरणावरील अन्नधान्याच्या खाजगी व्यापारावरील सर्व बंधने दूर केली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सन 1958 मध्ये मात्र अन्नधान्याचे उत्पादन कमी होऊन 58.3 दशलक्ष टन झाले. तेव्हा भारत सरकारने अन्नधान्य व्यापारावर नियंत्रण आणले आणि सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून गहू, तांदूळ व डाळी यांचे वितरण करायला सुरुवात केली. तसेच याच काळात सार्वजनिक वितरण प्रणालीची कार्यक्षमता वाढविण्यात आली.

सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून गहू, तांदूळ आणि डाळी याबरोबरच साखर, रॉकेल, स्वयंपाकासाठी आवश्यक वस्तू उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. देशातील सार्वजनिक वितरण प्रणाली अधिक बळकट करण्यासाठी व लोकांना जास्तीत जास्त अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यासाठी रेशन धान्य दुकानांची म्हणजेच स्वस्त धान्य दुकानांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढविण्यात आली. सन 1957 मध्ये देशात रेशन धान्य दुकानांची संख्या 18,000 होती ती सन 1961 मध्ये 51,000 पर्यंत वाढविण्यात आली. शिवाय पी. एल. - 480 कराराच्या अंतर्गत अमेरिकेतून आयात केलेल्या अन्नधान्याचे वितरण सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आले. त्यामुळे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस सार्वजनिक वितरण प्रणालीला देशातील सामाजिक सुरक्षा प्रणाली करण्यासाठी सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून सुयोग्य अन्नधान्य किंमतीत उपलब्ध करुन देण्यात आले. त्याचबरोबर अनधान्याची होणारी सट्टेबाजी कमी करण्यासाठी बकर स्टॉकची संकल्पना सुरु करण्यात आली. देशात अन्नधान्याचा साठा करण्यासाठी व सार्वजनिक वितरण प्रणालीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सन 1965 मध्ये भारतीय खाद्य निगम आणि कृषी किंमत आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर सरकारने गहू, तांदूळ आणि डाळ या अन्नधान्याच्या किमान आधारभूत किंमती जाहीर करण्यात आल्या. भारतीय खाद्य निगम आणि कृषि किंमत आयोगाने खुल्या बाजारातून अन्नधान्याची जास्त किंमतीला खरेदी करुन मोठ्या प्रमाणात देशात अन्नधान्याचा साठा तयार केला. दरवर्षी हंगामाच्या काळात भारतीय अन्नधान्य महामंडळ खुल्या बाजारातून अन्नधान्य बाजार किंमतीला खरेदी करुन ते धान्य सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून देशातील लोकांना कमी किंमतीला वितरित केले जाते. जर देशात कृषी क्षेत्रात अन्नधान्य उत्पादनात घट झाली तर भारतीय अन्नधान्य महामंडळ व कृषी किंमत आयोग शासनाच्या वतीने दुसऱ्या देशातून अन्नधान्याची आयात करते व ते धान्य देशातील जनतेला सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून स्वस्त किंमतीला उपलब्ध करुन देते.

सार्वजनिक वितरण प्रणालीचा मुख्य उद्देश देशातील दुर्बल घटकांना कमी किंमतीमध्ये अन्नधान्य उपलब्ध करुन देशातील लोकांचा पोषण स्तर वाढविणे हा आहे. सन 1960 ते 1970 या दशकात सार्वजनिक वितरण प्रणालीने देशातील दुर्बल घटकांना कल्याणकारी कार्यक्रम राबविण्याचे काम केले आहे. त्यामुळे देशात अन्नधान्याच्या किंमती स्थिर होण्यास मदत झाली. तसेच खाजगी व्यापाऱ्यांमार्फत जी कृत्रिम अन्नधान्य टंचाई हेतू पुरस्कर केली जात असत व मोठ्या प्रमाणावर किंमती वाढवून मोठ्या प्रमाणावर नफेखोरी केली जात होती. अन्नधान्य टंचाईच्या काळात खुल्या बाजारातील खाजगी व्यापाऱ्यामार्फत अन्नधान्य जास्तीत जास्त नफा मिळविण्याच्या हेतूने अन्नधान्य जास्त किंमतीला विकण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम गरिब वर्गातील लोकांवर मोठ्या प्रमाणावर झाला होता. देशातील दारिद्र्यारेषेखालील लोकांची खरेदीशक्ती कमी असल्यामुळे वाढत्या अन्नधान्य किंमतीचा परिणाम देशातील लोकांना अन्नधान्य खरेदी करण्यास मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होतात. परंतु सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून देशातील गरिब वर्गातील लोकांना गहू, तांदूळ, साखर, खाद्य तेल, डाळी व रॉकल इत्यादी उपभोग्य वस्तू कमी किंमतीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

देशातील सर्वच जनतेला सार्वजनिक वितरण प्रणालीचा लाभ मिळावा म्हणून सन 1980-90 च्या दशकात सार्वजनिक वितरण प्रणालीचा विस्तार देशातील विविध राज्यांतील ग्रामीण भागात करण्यात आला. याच काळात सार्वजनिक वितरण प्रणालीला एक कल्याणकारी कार्यक्रम म्हणून दर्जा देण्यात आला. त्यानंतर अनुसूचित जमातीच्या 5.7 कोटी लोकसंख्या असलेल्या विभागामध्ये सन 1985 मध्ये स्वस्त दरात अन्नधान्य उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न करण्यात आले. देशात आज 4.62 लाखापेक्षा जास्त रास्त भावाच्या दुकानांचे नेटवर्क तयार झालेले आहेत. दरवर्षी 30,000 कोटी रुपयांचे अन्नधान्य व इतर वस्तूंचे वितरण केले जाते. भारतात दरवर्षी 16 कोटी कुटुंबांना सार्वजनिक वितरण प्रणालीचा लाभ होतो. त्यामुळे भारतातील सार्वजनिक वितरण व्यवस्था जगात सर्वात मोठे अत्रधान्य वितरण नेटवर्क बनलेले दिसून येते.


**कार्यपद्धती, व्यवस्थापन व वितरण प्रक्रिया**

भारताची सार्वजनिक वितरण प्रणाली (Public Distribution System – PDS) ही देशातील गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांच्या अन्नसुरक्षेसाठी राबविली जाणारी सर्वात महत्त्वाची योजना आहे. ग्रामीण व आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये PDS चे स्थान अधिक महत्त्वपूर्ण ठरते, कारण अशा भागांत रोजगाराची अनिश्चितता, आर्थिक मर्यादा, अशिक्षितता आणि बाजारपेठांपर्यंत मर्यादित पोहोच यांमुळे स्वस्त धान्याच्या उपलब्धतेला विशेष महत्त्व प्राप्त होते. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा हा अत्यंत दुर्गम, जंगलाळ आणि प्रामुख्याने आदिवासी लोकसंख्येचा प्रदेश असल्यामुळे येथे सार्वजनिक वितरण प्रणाली ही लोकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य आधारस्तंभ बनली आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीची कार्यपद्धती जिल्हा पुरवठा कार्यालयापासून सुरू होऊन तालुका स्तरावरील पुरवठा निरीक्षक, मंडळ अधिकारी, ग्रामपंचायत आणि शेवटी स्वस्त धान्य दुकानांपर्यंत पोहोचते. शासनाकडून तांदूळ, गहू, साखर, केरोसीन यांसारखी आवश्यक वस्तू निश्चित कोट्यानुसार जिल्ह्यात पाठविली जाते आणि तेथून पुढे ती पुरवठा साखळीमार्फत लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविली जाते. या कार्यपद्धतीमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी गेल्या काही वर्षांत राशनकार्ड डिजिटायझेशन, आधार लिंकिंग, ई-पीओएस मशीनद्वारे डिजिटल वितरण, डोअर-स्टेप डिलिव्हरी यांसारख्या सुधारणा अंमलात आणल्या गेल्या आहेत. या सुधारणांमुळे वितरणातील गळती कमी होणे, योग्य लाभार्थ्यांना योग्य प्रमाणात धान्य मिळणे आणि दुकानांतील गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवणे अपेक्षित आहे.

PDS चे व्यवस्थापन गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात अनेक अडचणींना सामोरे जाते. भौगोलिक अडथळे, दुर्गम गावे, दळणवळणाची अपुरी साधने, पावसाळ्यातील रस्ते खंडीत होणे, सुरक्षा परिस्थिती, तसेच लाभार्थ्यांचे कमी शिक्षण आणि तांत्रिक सुविधांचा अभाव यांमुळे या व्यवस्थेची कार्यक्षमता प्रभावित होते. तरीही पुरवठा विभाग, स्थानिक प्रशासन आणि स्वस्त धान्य दुकान संचालक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे PDS सतत कार्यरत ठेवले जाते. विविध अधिकारी वर्गांची जबाबदारी, दुकानदारांची भूमिका, तसेच ग्रामपंचायतीचे देखरेखीचे उत्तरदायित्व यांचा PDS च्या व्यवस्थापनावर थेट परिणाम होत असतो.

वितरण प्रक्रिया ही सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा कणा मानली जाते. गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येक स्वस्त धान्य दुकानात महिन्याच्या ठराविक तारखांना वस्तूंचे वितरण केले जाते. लाभार्थ्यांनी ई-पीओएस मशीनवर अंगठा पडताळणी केल्यावर किंवा आधार ओटीपी वापरून वस्तू प्राप्त केल्या जातात. वितरणाचे रजिस्टर, कोटा, दरपत्रक, लाभार्थी यादी, स्टॉक तपशील यांचे सार्वजनिक प्रदर्शन अनिवार्य आहे. तथापि, काही दुर्गम भागांत इंटरनेटची अनुपलब्धता, बायोमेट्रिक डिव्हाइसची अडचण, वेळेवर पुरवठा न पोहोचणे किंवा लाभार्थ्यांची जागरूकता कमी असणे अशा समस्या आढळतात. या समस्या सोडवण्यासाठी जिल्हा प्रशासन सतत निरीक्षण, तपासणी आणि दुरुस्तीची प्रक्रिया राबवत असते. या सर्व प्रक्रियेचा एकत्रित विचार करता, गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणाली ही केवळ धान्य पुरवठ्याची व्यवस्था नसून, लोकांच्या अन्नसुरक्षेचे संरक्षण करणारी, सामाजिक स्थैर्य देणारी आणि आर्थिक भार कमी करणारी मूलभूत योजना आहे. त्यामुळे PDS ची कार्यपद्धती, व्यवस्थापन आणि वितरण प्रक्रिया यांचे अभ्यासपूर्वक परीक्षण करणे हे अत्यंत आवश्यक ठरते, जेणेकरून या व्यवस्थेतील त्रुटी शोधून प्रभावी सुधारणा सुचवता येतील आणि लोकांपर्यंत योजनांचा लाभ अधिक सुलभतेने पोहोचू शकेल.




Anusandhanvallari
Vol 2024, No.1
December 2024
ISSN 2229-3388

**सामाजिक व आर्थिक जीवनमानावर झालेला प्रभाव**

भारतामध्ये सार्वजनिक वितरण प्रणाली (Public Distribution System – PDS) ही गरिबी कमी करण्यासाठी, अन्नसुरक्षा मजबूत करण्यासाठी आणि असमानतेतून मुक्ती मिळवण्यासाठी राबविण्यात येणारी सर्वात व्यापक आणि महत्त्वपूर्ण योजना आहे. देशातील सर्वसामान्य, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, कृषीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसाठी तसेच आदिवासी, ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांसाठी PDS ही जीवनसुरक्षेची प्रमुख योजना आहे. तांदूळ, गहू, साखर, डाळी, केरोसीन अशा आवश्यक वस्तू सुलभ दरात उपलब्ध करून देत PDS लाभार्थ्यांच्या दैनंदिन जगण्याला थेट आधार देते. त्यामुळे या व्यवस्थेचा लाभार्थ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनमानावर प्रभाव तपासणे अत्यंत आवश्यक ठरते.

जिल्हास्तरावर PDS चा प्रभाव फक्त धान्य पुरवठ्यापर्यंत मर्यादित नसून, तो ग्रामीण समाजरचनेला स्थैर्य, आर्थिक सुरक्षितता आणि पोषणमूल्याची हमी प्रदान करतो. विशेषतः गरीब, आदिवासी, अनुसूचित जाती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग तसेच असंघटित क्षेत्रातील कुटुंबांच्या जीवनात PDS महत्त्वपूर्ण बदल घडविते. अन्नधान्य सुलभ दरात उपलब्ध झाल्यामुळे कुटुंबातील मासिक खर्च कमी होतो, जेवणातील नियमितता टिकून राहते आणि कुपोषणासारख्या समस्यांमध्ये घट होते. अशा प्रकारे PDS थेट आर्थिक भार कमी करून जीवनमान सुधारण्यास मदत करते.


सामाजिक दृष्टीकोनातून पाहता, सार्वजनिक वितरण प्रणालीने ग्रामीण आणि दुर्गम भागांत अन्न हा अधिकार असल्याची जाणीव दृढ केली आहे. कुटुंबातील महिलांवर असलेला अन्नसुरक्षेचा मानसिक ताण कमी होतो आणि मुलांच्या पोषणात सुधारणा दिसून येते. PDS मुळे लाभार्थ्यांच्या दैनंदिन आहारातील स्थैर्य वाढते, ज्याचा सकारात्मक परिणाम त्यांच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि सामाजिक सहभागावर होतो. सतत उपलब्ध धान्यामुळे स्थलांतराची गरज कमी होते आणि कुटुंबांचे सामाजिक स्थैर्य टिकून राहते.

जिल्ह्यातील लाभार्थ्यांचे उत्पन्न मर्यादित असल्याने PDS त्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढणारे एक महत्त्वाचे साधन बनते. बाजारातील महागाई, शेतीतील अनिश्चितता, रोजगाराच्या बदलत्या संधी यांमुळे कुटुंबांच्या खर्चावर मोठा ताण येतो. अशा परिस्थितीत स्वस्त धान्य दुकानांमधून मिळणारे अन्नधान्य त्यांना इतर आवश्यक गरजांसाठी आर्थिक बचत करण्यास मदत करते. परिणामी, लाभार्थी कुटुंबे शिक्षण, वैद्यकीय सेवा, वाहतूक, कपडे इत्यादी इतर क्षेत्रांवर खर्च करू शकतात, ज्यातून एकंदर आर्थिक प्रगतीला चालना मिळते.

**सारांश**

सार्वजनिक वितरण प्रणाली (Public Distribution System – PDS) ही भारतातील गरीब व वंचित घटकांच्या अन्नसुरक्षेसाठी राबविण्यात आलेली सर्वांत महत्वाची व्यवस्था मानली जाते. विशेषतः आदिवासी व दुर्गम भागांचा समावेश असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात ही योजना लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. प्रस्तुत अध्ययनाचा उद्देश गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीची कार्यपद्धती, व्यवस्थापन, वितरण प्रक्रिया आणि लाभार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक जीवनमानावर झालेल्या परिणामांचे चिकित्सक परीक्षण करणे हा आहे. संशोधनातून असे निदर्शनास आले की PDS ने जिल्ह्यातील कुटुंबांच्या अन्नसुरक्षेला बळकटी मिळवून दिली असून आर्थिक भार कमी करण्यास मोठी मदत केली आहे. स्वस्त धान्य दुकाने नियमित कार्यरत असल्यामुळे कुटुंबांच्या मासिक खर्चात बचत होते आणि पोषणघटकांचे उपलब्धतेचे प्रमाण सुधारते. विशेषतः आदिवासी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये PDS मुळे सामाजिक स्थैर्य, आत्मविश्वास आणि जीवनमानाविषयी सकारात्मक बदल दिसून येतो. तथापि, दुर्गम भौगोलिक परिस्थिती, अपुरी दळणवळण साधने, पुरवठा साखळीतील अडथळे, तांत्रिक अडचणी, लाभार्थ्यांच्या जागरूकतेचा अभाव आणि काही ठिकाणी व्यवस्थापनातील कमतरता अशा समस्या अद्यापही आव्हान म्हणून उभ्या आहेत.

प्रस्तुत अभ्यासातून निष्कर्ष निघतो की सार्वजनिक वितरण प्रणाली ही गडचिरोली जिल्ह्यातील सामाजिक-आर्थिक विकासाची एक महत्त्वपूर्ण कडी आहे. ही योजना योग्य प्रकारे अंमलात आणल्यास लोकांच्या जीवनमानात अधिक सुधारणा घडवून आणता येऊ शकते. या व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी तांत्रिक पायाभूत सुविधा मजबूत करणे, नियमित निरीक्षण, लाभार्थी






जागृती कार्यक्रम आणि स्थानिक प्रशासनाची सहभागी भूमिका वाढविणे आवश्यक आहे. अशा प्रकारे PDS अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि समतोल बनू शकते व भविष्यातील अन्नसुरक्षा व्यवस्थेला बळकटी मिळू शकते.

**संदर्भग्रंथ सूची:**

[1] गोखले, पी. डी. (2018). भारतातील सार्वजनिक वितरण प्रणाली: रचना व कार्य. पुणे: श्रीविद्या प्रकाशन.

[2] देशमुख, आर. के. (2020). ग्रामीण विकास व अन्नसुरक्षा धोरणे. नवी दिल्ली: अटल प्रकाशन.

[3] महाराष्ट्र शासन (2022). सार्वजनिक वितरण प्रणाली अहवाल. मुंबई: अन्न व नागरी पुरवठा विभाग.

[4] Kulkarni, S. (2017). Food Security and PDS in India. Mumbai: Himalaya Publishing House.

[5] Maharatna, A. (2019). Food Policies and Rural Poor in India. New Delhi: Oxford University Press.

[6] Gadchiroli District Collector Office. (2021). District PDS Performance Report. Gadchiroli: District Supply Office.

[7] Sen, A. (2016). Poverty and Public Distribution System in India. New Delhi: Sage Publications.

[8] Dongre, S. (2018). A Study on Targeted Public Distribution System in Maharashtra. Aurangabad: Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University.